REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# मराठीतील अहिराणी, खानदेशी गीतांमधील मिथके : एक दृष्टिक्षेप

डॉ. संभाजी मलघे
इंद्रायणी महाविद्यालय,
तळेगाव, पुणे.

## प्रस्तावना




'मिथक' या संकल्पनेसाठी इंग्रजीमध्ये डनजी असा शब्द वापरण्यात येतो. मिथकामध्ये संस्कृतीचे स्वरूप विशेष, त्यांचा प्रवास, बदल याबाबतची गुपिते, खुणा दडलेल्या असतात.

मिथके प्राचीन काळापासून प्रवाहीत आहेत असे मानले जाते. मिथकांच्या मागे अनेक घटक कार्यरत असतात, कारणीभूत असतात. निसर्गातील अनेक घटना मिथक रूपाने मांडल्या जातात. दिवस आणि रात्रीचे अव्याहत चालणारे चक्र, सूर्याची विविधांगी उपयोगिता, सूर्यप्रकाश, विभ्रम, चंद्र आणि त्याच्या कला, पावसाची विविध रुपे, वादळे, निसर्गात घडणाऱ्या विध्वंसक घटना, समुद्र, समुद्राची अथांगता, समुद्राच्या तळातील गुपीते, समुद्रसृष्टी, सभुद्राभोवतीच्या आख्यायिका, गुढत्व निसर्गातील विविध आवाज, प्राणीजगत, पक्षीजगत यांचाही विचार केलेला असतो. या घटकांमधूनच वेगवेगळ्या देवदेवता निर्माण झालेल्या दिसतात. निसर्गाचा विविधरंगी, विविधढंगी आविष्कारातून मिथके निर्माण होतात.

मिथकांचे स्थूलमानाने वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला गेला आहे, अर्थात तो अपूर्णच आहे. यामध्ये सूर्य, अग्नी, वायू या सृष्टीच्या मानलेल्या देवता, वेगवेगळी दैवते उदा. सोम, कुबेर, कामदेवता, यम इ.चा समावेश आहे. मिथकामध्ये अलौकिक व्यक्तींचाही समावेश आढळतो. यामध्ये बळीराजा, महावीर, प्रल्हाद, दौप्रदी, सावित्री, भीष्म, एकलव्य अशा अलौकिक पुरुषांचा समावेश आहे. स्वर्ग, स्वर्गातील विविध लोकही 'मिथक' संकल्पनेमध्ये समाविष्ट होतात. स्वर्ग, स्वर्गाची अलौकिकता, अप्सरा, कल्पवृक्ष यश, गंधर्व आदिंचा समावेश होतो.

ग्रहांची सृष्टी हेही मिथक निर्मितीसाठी पुरक प्रेरक मानली गेलेली सृष्टी आहे चंद्र, सूर्य, बुध, गुरु, शुक्र, शनि, मंगळ, राहू, केतू यांचा विचार केलेला दिसतो.

विविध पर्वतही 'मिथक' रुपात आलेले दिसतात. उदा. हिमालय पर्वत, कैलास पर्वत, मंदार पर्वत, गोवर्धन पर्वत इ. त्याचप्रमाणे लोकांनी मान्य केलेली दैवते म्हणजे लोकदैवतेही यामध्ये समाविष्ट आहेत. म्हसोबा, पीर, मतोबा, खंडोबा, विठोबा ही काही लोकदैवते आहेत. विविध भाषांमधून लोकगीत आणि लोककथांमधून, लोककलांमधून ही मिथके आढळून येतात.

## मिथकांमधील आशय आणि अन्वयार्थ विवेचन आणि काव्य : सहसंबंध :–

मिथकांमधील आशय शोधणे आवश्यक असते. ''बऱ्याच वेळा मिथक म्हणजे असत्य, अविश्वसनीय खोटे, दिशाभूल करणारे, ओढून–ताणून रचलेले, गारुड, भूलथापा अशा अर्थाने या संज्ञेचा उपयोग होतो. अर्थात 'मिथक' हे इतिहासातल्या 'सत्या' सारखे 'सत्यही' नसते. ती 'हकिगत' ही नसते. मिथक ही कथा असते. या कथेत 'इतिहास' किंवा ऐतिहासिक सत्य' नसते. पण इतिहासकालीन माणसाच्या मनातील सत्याची प्रतिमा व आजूबाजूच्या घटनांचा कल्पित अन्वयार्थ दडलेला असतो. मानवी ज्ञान आणि बाहय सृष्टी याविषयीच्या गूढांचे आकलन करून मिथकांची निर्मिती झाली.''[1] हे लक्षात घेऊन मिथकांकडे पहायचे असते.

मिथकांकडे पाहण्याचा मोठा धोका रमेश कुंतल मेघ यांनी व्यक्त केला आहे तो असा– ''चीज या कृती या संघटना में एक ओर तो वाद प्रतिवाद के विरुध्दों का सामंजस्य होता है, तो दुसरी ओर स्वरूप (फार्म) एवं

विषयवस्तू (कांटेंट) की एकता। इस द्विपर्णता को अलग–थलग करणे या रखने की कोशिश में ही हम कथित शुद्ध और पूर्ण रूप के इंद्रजाल में फँस जाते है।''[2] या धोक्याकडे लक्ष दयावे लागते. लोकसाहित्यामधून ही मिथके वेगवेगवळ्या स्वरुपात, वेगवेगळ्या अर्थांनी वापरलेली आहेत.त्यामागील सत्य शोधण्याचा प्रयत्न अपेक्षित आहे.

लोकगीतांमधून लोकजीवन त्याच्या विशेषांसह व्यक्त होत असते. लोकमनाला विविध भावभावना असतात. त्यांचे प्रकटीकरण म्हणजे ही लोकगीते आहेत, म्हणूनच लोकगीतांमधून आचार–विचार, रुढी, परंपरा, वेगवेगळ्या प्रकारच्या श्रध्दा, लोकप्रथा, लोकभ्रम, कर्मकांड, सामाजिक सहसंबंध, नाती–गोती या घटकांचा समावेश होत असतो.

लोकगीतांमधून मिथकांसह हे सारे व्यक्त झालेले दिसते. त्यांचा आशय या गीतांमधून शोधता येणे शक्य आहे काय? याचा विचार या शोधनिबंधामध्ये केला आहे.

## अहिराणी, खानदेशी लोकजीवनातील मिथकांचे स्वरुप आणि त्यांचे विवेचन :–

लोकगीतांचे उत्तम संकलन, संपादन करण्यात आले आहे. या गीतांमधून मिथकांबाबत विचार करता येतो. ही अहिराणी, खानदेशी गीते मिथकांनी समृद्ध आहेत.

स्थानिक लोक लोकदेवतांना आपले गाऱ्हाणे सांगतात, नवस करतात यामागे इच्छापूर्ती ही भावना असते. मात्र ही इच्छा व्यक्त करताना आदरभाव व्यक्त केला जातो. देवदेवतांची करुणा भाकली जाते.उदा.

**''कानबाई माय**
**तुन्हा करसू वं रोट**
**खपी चालनी हयाती**
**पिकू दे मन्हं पोट**
**आज कानकाबाईना येवा**
**पाच शेरना रोट करु**
**डिकरा–खोकरा जेवाइ**
**गोमतीरे घर सारू''[3]**

अशा प्रकारे नवस केला जातो.

मात्र या कानबाई देवीचा शोध वेध घेतला तर या मिथकाच्या मागे दैवतकथा दिसून येतात. कानकाई आदिमानवाची प्राचीनतम रुपातली देवी मानली जाते. तिला आदिशक्तीचे रुप मानले आहे. ती कृषी संस्कृतीचे एक रूप आहे. कानबाईची स्थापना श्रावण, चैत्र, वैशाख किंवा माघ महिन्यात केली जाते. या देवीला या महिन्यात वाजत–गाजत घरी आणले जाते. 'बिजोरा' म्हणजे पेरूच्या आकाराचे हिरवे फळ घ्यायला वाजत गाजत जावे लागते, हे फळ आणल्यानंतर या देवीची स्थापना केली जाते.

या देवीला आणण्यासाठी, तिचा वरदहस्त लाभण्यासाठी आर्त भावाने या देवीला साद घातली जाते ती अशी–

**''खानदेसनी आई व माता**
**खेलरी कानबाई झालरियाँ**
**मांडव मझार हूल उठनी व साजनी**
**खानदेसन माहेर आंबे उनी व साजणी**
**किती इनत्या करु माय तुले**
**डोया भुकेला तुन्ह रूप दखाले''[4]**

ह्या आर्ततेमागे गरिबीमुळे आलेली असहाय्यता आहे. ती असहाय्यता गीतामधून अशी व्यक्त केली आहे–

**''नानापरीनी करी सजावट**
**आन् कोठून मी बामन भट**
**शक्ती आम्हनामा जशी**
**पूजा करू आमी तशी**
**चारी बाजूले चार समया**

**कर आम्हनावर दया माया''[5]**

आम्ही भोळीभाबडी माणसे तुझी सेवा करू, तुझा ध्वज लावू, तुझे गुण गाऊ अशा प्रकारे आळवणी केली जाते. मात्र काननदेवीया उत्पत्तीविषयीची जी मिथके आलेली आहेत त्या मिथकांमधील अर्थ लावणे, शोधणे अवघड आहे.

**''चैतन्यसाडी नेसून। ब्रम्हकाचोळी घातली हिनं**
**बहु प्रकाश गाजे। जग मोहिला असा मुखडा साजे**
**माझी कानोळ खेडे फुगडी। आकाशाची नेसून चुंदडी**
**चंद्र सूर्य कुंडल कानी। दिवसा रात्रीची नेत्रात काजरी**
**चार वेदांच्या दोर, शेषाचा हार। पायी पैंजण राशींचे बारा**
**पोत अठरापुराणे हिरे, नऊ लाख तारे, कौरवांचे पायी जोडे''[6]**

अशा वर्णनातून अर्थ काढणे कठीण आहे. या मिथकांमधील प्रतीक अर्थ, उरलेला अंश अर्थ एव्हडेच सांगतो की हे सारे काही गुढ आहे, अतर्क्य आहे, कल्पनातील आणि अदभुत आहे. कानकाईच्या पुजेमागचे किंवा तिच्या अलंकारांविषयीचे हे वर्णन संस्कृतीच्या अंगाने तपासले तर यामध्ये पूर्वसंकेत आणि स्त्री–सुलभ भावना स्पष्टपणे व्यक्त होतात. देवदेवतांचे मानवीकरण करताना त्यांना मानवाच्या सामान्य पातळीवर आणले जात नाही. देव–देवतांचे श्रेष्ठत्व अबाधित राखले जाते, ते सुख दुःखाचे भागीदार असले, तारणहार असले तरीही भक्त आणि देव यांचे पृथकत्त्व सावधानतेने राखले जावे हे या गीतामधून स्पष्ट होते. ते भान राखले गेलेले दिसते.

खानदेशामध्ये गवराई देवीची पूजा केली जाते. खानदेशामध्ये या देवीची पूजा करणारे शेकडो भक्त आहेत. घरोघरी या गौरा किंवा गौर मांडली जाते. सासरला गेलेल्या लेकीबाळी या सणासाठी माहेराला येतात. या माहेरवाशिणी आपापल्या माहेरला आल्यानंतर आनंदात डुंबून जातात. झाडांना झोके बांधले जातात. झोके खेळले जातात. टिपरी नृत्य केले जाते गवराई देवीच्या निमित्ताने हा आनंद सोहळा रंगतो.

खानदेशामध्ये 'सप्तशृंगी' नावाच्या देवीचे देऊळ आहे, हे नाशिक जिल्ह्यामध्ये आहे. या मंदिरात पोहचण्यासाठी मोठा कष्टदायक रस्ता आहे. सात डोंगरांचा हा परिसर आहे या मंदिरात पोहचण्यासाठी भक्तांना साडे सातशे पायऱ्या चढाव्या लागतात. सप्तश्रृंगी देवीविषयीच्या गीतांमधून ही देवी दख्खनचे सासर असणारी होती, याचा उल्लेख पहायला मिळतो.

या गीतात हा दाखला असा मांडला आहे–

**''तुनं खानदेशनं माहेर,**
**तुनं खानदेशनं माहेर,**
**तुनं दख्खन सासर**
**व सत्तरशिंगी माय''[7]**

या देवीच्या संदर्भाने आख्यायिका आणि मिथके मांडली जातात. ही देवी स्वयंभू म्हणून ओळखली जाते. ह्या देवीला अठरा हातांची 'महालक्ष्मी' म्हणून ओळखले जाते. ही देवी आपली विविध रूपे दिवसभरात दाखविते असेही म्हटले जाते. जसे की– सकाळी बाल्यावस्थेतील रूपामध्ये दिसते, दुपारी ती तरुण अवस्थेमध्ये दिसते आणि संध्याकाळच्या वेळी ती वृध्द अवस्थेत दिसते. या देवीने महिषासूर नावाच्या प्रजेला छळणाऱ्या राक्षसाचा नायनाट केला म्हणून या देवीला 'महिषासूर मर्दिनी' असे नाव लोकांनी दिले होते. ते नाव आजही या देवीच्या नावाभोवती जोडले गेले आहे. महाराष्ट्रामध्ये साडेतीन शक्तीपीठे मानली जातात. सप्तशृंगी देवी चे हे मंदिर अर्धे शक्तीपीठ मानले जाते. या मिथकांचा विचार या अनुषंगाने करावा लागतो. देवताविषयक मिथके म्हणून या मिथकांकडे पहावे लागते.

नशिबाची किंवा भाग्याची देवता म्हणून 'सटवाई' या देवीकडे पाहिले जाते. सटवाईची ओळख महाराष्ट्रातील गावागावातील माणसांना आहे. ही सटवाई मूल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी मूलाचे भाग्य त्याच्या कपाळावर लिहिते असे 'मिथक' या देवीभोवती आजही संबंधित मानले जाते. मात्र 'सटवाई' जे काही लिहिले ते चांगले लिहावेयासाठी या देवीची पूजा केली जाते.

या देवीच्या पूजेची पद्धत सगळीकडे सारखी आहे. अपत्याच्या जन्माच्या पाचव्या दिवशी या देवीची पूजा करतात. संध्याकाळी लाकडी पाटावर पूजेचे साहित्य मांडले जाते. यामध्ये काजळ असते, हळद–कुंकू, बाळाच्या बाळगुटीचे साहित्य. दूधाची वाटी, बाळाचे काजळ, दाताचे दातवण ठेवले जाते. त्यानंतर कोरा कागद पेन

बाळंतिणीच्या खाटेखाली ठेवले जाते. या प्रकारे तयारी केली जाते. त्या कागदावर जे उमटेल किंवा जाणवेल ते वाचण्याचा प्रयत्न करावा लागतो, अर्थ शोधावे लागतात. हे सटवीचे भविष्य. हाच नशिबाचा लेखाजोखा, त्याच्यापुढे कुणालाही जाता येत नाही. तेच त्या बाळाचे भविष्य असते, भवितव्य असते असा समज आहे. हे मिथक या गाण्यात असे मांडले आहे–

**''बायी घड्, सटी घड्, सरी घडस सोनार।**
**सटीना लेख मोठा, कोन धनी वाचणार।।**
**सटी सांगस, ब्रम्हा लिखे रातोरात।**
**नासिक फुटकं, जोजारले काय कर थिन मायबाप।।**
**वाडवडील जे सांगतस जे समदं खरं**
**सटीना टाक मव्हरे कोन जास बर।।''[8]**

अशाप्रकारे सटवाईचा लेख असतो. ज्याप्रमाणे सोनार सरीची जडण–घडण करतो, तशीच ही नशिबाची जडण–घडण असते. ज्यांचं नशिबच सटवाईने फुटकं ठरवलं आहे त्या फुटक्या नशिबापुढं आईवडील तरी काय करणार? अशी दैववादी प्रतिक्रिया या गीतामधून व्यक्त केली आहे. माणसाने मान्य केलेली दैववादी, नशिबवादी विचारसरणी या गीतामधून व्यक्त केली आहे. सटवाई आणि माणसाचे नशिब हे मिथक शेकडो वर्षांपासून चालत आले असे दिसते.

लोकगीतांमध्ये अशा मिथकांची रेलचेल आहे. देवदेवतांची संख्याही अफाट आहे. तेहेतीस कोटी देवदेवतांच्या भोवती शेकडो हजारो मिथके आहेत. देवदेवतांच्या भोवती जाती परंपराही गुंफल्या गेल्या आहेत. देवता आणि जाती विशेष यांचाही समन्वय पहायला मिळतो. 'लोकसंस्कृती' यांमधूनच प्रवास करीत आली आहे.

वेगवेगळ्या देवदेवतांविषयी द. ता. भोसले म्हणतात– ''खेड्यापाड्यातून आपणाला खंडोबा, ज्योतिबा, बहिरोबा, सिदोबा, म्हसोबा, खळनाथ, यल्लमा, रेणुका, काळूबाई यांसारख्या आणखी कितीतरी देवदेवतांची मंदिरे पहावयास मिळतात. या त्यांच्या ग्रामदेवता झालेल्या आहेत. भागवत संप्रदायाच्या दीर्घकाळ, सर्वदूर आणि व्यापक स्वरुपात झालेल्या प्रसारामुळे आणि त्याचे आचार–विचार सोपे असल्यामुळे या ग्रामदेवतांबरोबरच विठोबाची मंदिरे ही खेड्यातून पाहावयास मिळतात. याचा अर्थ असा की लोकसंस्कृतीने ज्या देवदेवतांची पूजा अर्चा स्वीकारली. त्यातूनच तिला वेगळेपण प्राप्त झालेले आढळते. ही पूजा अर्चाही उन्नत जीवनाच्या ओढीपायी निर्माण झालेली नाही. अरिष्टापासून संरक्षण, कोपापासून कृपा, सुख आणि समृध्दी यापोटी निर्माण झाली आहे.''[9]

अहिराणी, खानदेशी गीतांमधून ही मिथके काहीशी असाच अर्थ व्यक्त करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. या अहिराणी आणि खानदेशी लोकगीतांमधून देवदेवताविषयी या श्रद्धा आणि देवदेवतांकडून ठेवलेल्या अपेक्षा पाहिल्या तर हेच अधोरेखित होते.

या गीतांमधल्या मिथक म्हणून आलेल्या देवदेवता त्यांच्या पूजाविधी हे संस्कृतीच्या प्रवाहातील अवशेष आहेत. या अवशेषांवरुन या समुहाचे सश्रद्ध समुहमन व्यक्त झालेले दिसते.

माणूस आणि दुःख, माणूस आणि त्याचे संसारिक दुःख, माणूस आणि निसर्गाचे त्याचे असणारे एकजीवत्व याविषयीचे विचार, भाव ही गीते स्पष्ट करतात. मानवाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा आणि कामभावना याविषयीचे समाधान–असमाधान किंवा भविष्यकाळाची काळजी या गीतांमधून व्यक्त झालेली दिसते.

खेड्यापाड्यातील ही माणसे शेवटी अशा देवदेवतांचा आधार घेताना दिसतात. या 'मिथकांना' व्यक्त होता आले असते तर या मिथकांचा उलगडा झाला असता. या गीतातील मिथके आपल्या पूर्वजांच्या भावभावना साध्या भाषेत व्यक्त करीत आहेत, मात्र ही साधी भाषाच गुपित भाषा झाली आहे. 'मिथके' ही त्याचेच अंतीम रूप आहे, हे अहिराणी, खानदेशी गीतांमधून स्पष्ट होते.

## संदर्भ

1. वरखेडे रमेश – लोकसाहित्य संशोधनपद्धती, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक, प्रकाशन वर्ष–2002, पृ.16
2. मेघ रमेश कुंतल – मिथक से आधुनिकता तक वाणी, प्रकाशन नवी दिल्ली, प्रथम संस्करण–2008, पृ.1
3. पगारे म. सु. –अहिराणी लोकगीतातील लोकतत्त्व, इहवाद आणि लोकभाषा प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव द्वितीय आवृत्ती–2003, पृ.129

4. सावंत उषा व्ही. – खानदेशातील अहिराणी स्त्री–गीते, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती–2005, पृ.31
5. सावंत उषा व्ही. – उपरोक्त, पृ.33
6. सावंत उषा पी. – उपरोक्त, पृ.36
7. पगारे म. सु. – उपरोक्त, पृ.137
8. सावंत उषा व्ही. – उपरोक्त, पृ.41
9. भोसले द. ता. – लोकसंस्कृती स्वरुप आणि विशेष, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती–2004, पृ.15